# राजपुत्र अंभीची हेरगिरी !

अंभीने शरणागती पत्करल्याबद्दल त्याचा सल्लागार व गुरू आणि तक्षशिला विद्यपीठाचा प्राचार्य असलेल्या आर्य चाणक्यने त्याला दोष दिला नाही. अलेक्झांडरने त्याचा पराभव केरणाUया पुरू व त्यांची शरणागती पत्करणाUया अभिसार आदी राजांना देशद्रोही म्हटले नाही. असे का ?

अंभी राज्यावर येण्यापूर्वी (पश्चिम पंजाब ते झेलमचा उत्तर किनारा) फक्त एक ते दीड महिना त्याचा पिता सम्राट अंभी मृत्यू पावला होता व लगेच म्हणजे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात अलेक्झांडर एक लाख वीस हजार सुसज्ज सैन्यासह चालून आला. अंभी हा राजपुत्र सुमारे बावीस–चौवीस वर्षाचा व राजकारणात नवखा होता त्याला कुटिल निपुण चाणक्यनेच कदाचित शरण जाण्याचा सल्ला दिला असेल.

त्याच्या शरण जाण्यामुळे तक्षशिला या सर्व प्राचीन नगरीचा, विश्वविद्यालयाचा होणारा नाश आठशे वर्षे पुढे ढकलला गेला (हुणांनी पाचव्या शतकात तक्षशिला नागरी जाळली) अंभीने यात कुठला स्वार्थ साधला? तक्षशिलेतील हजारो नागरिक, राजस्त्रिया व इतर स्त्रियांवर होणारे संभाव्य बलात्कार त्याने स्वतःशरण जाऊन टाळले.

अंभीची सेना फक्त पाच हजार होती. ती त्याला स्वतःचे ारज्य, सन्मान यांना बळी देऊन अलेक्झांडरला द्यावी लागली. नाहीतर, तो दुसरे करू शकला नसता, पंरतु त्याने आपला अपमान अलेक्झांडरला पूर्णपणे फसवून आणि त्याचा निःपात करण्यात महत्वाची कामगिरी बजावून केला. हे पुढील घना स्पष्टपणे दाखवतात.

1. फेब्रुवारी इसवी सनपूर्व 326 अलेक्झांडरचे 1.20 सैन्यासह तक्षशिलेत आगमन, पण झेलम किनाUयावर झालेले युध्द जुलै इसवी सनपूर्व 326.
2. तक्षशिलेपासून युध्दभूमी फक्त शंभर मैल दूर म्हणजे चार ते पाच दिवसांच्या टप्प्यांवर.
3. फेब्रुवारीत आलेल्या अलेक्झांडरला पाऊस नसताना पुरूचा पराभव सहज करता आला असता. जुलैमध्ये ऐन पावसाळ्यात युध्दे होत नसत.
4. अंभीने त्याला पुरूच्या नायनाट करण्यासाठी बोलावले असते तर केवळ शंभर मैल दूर व एक लाख सैन्य रखडवून ठेवण्याची त्याला काहीच गरज नव्हती.
5. अंभीने अलेक्झांडरला पुरूचा नाश करण्यासाठी बोलावले याला ग्रीक इतिहासात कुठलाही आधार नाही. त्यातही एवढया क्षुल्लक कारणसाठी परकीयाला आमंत्रण देणे म्हणजे आत्मघात करून घेण्यासारखे होईल हे कळण्याएवढा राजपुत्र अंभी व

त्याला गुरू आर्च चाणक्य राजनिपुण होते. राजपुत्र अंभीला त्याने दोषी ठरवले नाही. मुख्य म्हणजे स्वतःच्या राज्याच्या बदल्यात असे 'डील' कुठला सुखवस्तू राजा करील ?

6. ग्रीक रेकॉर्डप्रमाणे अंभी व पुरूचे नातेसंबंध होते. पुरू युध्दात बेचाळीस ते पंचेचाळीस वर्षाचा होता. राजपुत्र अंभी बावीस ते चोवीस वर्षाचा होता. अलेक्झांडरचे वय एकतीस होतं. आर्च चाणक्य अंभीला गुरूस्थानी म्हणजे सुमारे पस्तीसचा चंद्रगुप्त मौर्य हा अंभीचा मित्र व आर्य चाणक्य हा चंद्रगुप्तचा गुरू म्हणजे राजपुत्र अंभीच्या वयाचा होता. ही व्यक्तिमत्वे अंभी आर्य चाणक्य व चंद्रगुप्त आणि अलेक्झांडर सहा महिन्यांच्या काळात लालबाग ते कुलाबा व शिवडी ते वरळी एवढया क्षेत्रात वावरली.

आर्य चाणक्यने इसवी सनपूर्व 300 मध्ये म्हणजेच या युध्दानंतर पंचवीस वर्षांनी कौटिलीय अर्थशास्त्र हा जगप्रसिध्द ग्रंथ लिहिला. त्यात हेरगिरीवर त्याने विवंचन केलं आहे. त्यात हेरांचे गुणवर्णन आहे. राजपुत्र अंभी व स्वतः आर्य चाणक्य यांनी अलेक्झांडरची नामुष्की व पराभव यासाठी चंद्रगुप्त मौर्य व पुरूच्या संगनमताने एक योजना आखली व ती पूर्णपणे यशस्वी करून दाखवली. अलेक्झांडरचा सर्वप्रथम परमित्र, हितचिंतक या भूमिका वठवण्याची जोखीम पार पाडतानाच पुरूला युध्दतयारीसाठी पाच महिने वेळ मिळवून देणारा व स्वतःचे राज्य लादणाÚया उन्मत अलेक्झांडरला तक्षशिलेमार्गे वापस जाऊ न देणारा अंभी! चंद्रगुप्त मौर्याला सम्राटपद मिळाल्यानंतर अंभी व पुरूचे काय झाले हे कळत नाही.

– – –